# बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०१६

## भूगोल आणि अर्थशास्त्र

**वेळ : २ तास** **एकूण गुण : ४०**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
iii. प्र.३ (अ), (ब), (क) संपूर्णपणे नकाशा, आलेख पुरवणीवरच सोडवावा व तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.
iv. नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
v. १ ते ४ प्रश्न भूगोलाचे व ५ ते ७ प्रश्न अर्थशास्त्रावरील आहेत.
vi. आवश्यक तेथे सुबक आकृत्या काढा व नकाशाचा वापर करा.

१. (अ) **कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा :** [३]

१. क्षेत्रफळाच्या दृष्टीने ________ हे सर्वांत मोठे राज्य आहे.
(मध्य प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, राजस्थान)

२. पंजाब व हरियाणा मैदान ________ उत्पादनात अग्रेसर आहे.
(बाजरी, गहू, तेलबिया, ऊस)

३. पश्चिम घाटात ________ हे सर्वाधिक उंचीचे शिखर आहे.
(अनाईमुडी, दोडाबेट्टा, अन्नामलाई, के - २)

(ब) **'अ' स्तंभातील घटकांशी 'ब' स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा :** [३]

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| १. | बाभूळ | अ. | धार्मिक शहर |
| २. | वाराणसी | ब. | प्रसिद्ध थंड हवेचे स्थळ |
| ३. | महाबळेश्वर | क. | उत्तम पशुखाद्य |
| | | ड. | माहिती तंत्रज्ञान केंद्र |

२. (अ) **भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन) :** [४]

१. प्रादेशिकीकरण अत्यंत आवश्यक आहे.
२. हिमालयातील जवळजवळ सर्व नद्या बारमाही स्वरूपाच्या आहेत.
३. राजस्थानचे वाळवंट हे जगातील सर्वांत जास्त लोकसंख्येची घनता असलेले वाळवंट आहे.
४. छोटा नागपूर पठारावर खाणकाम मोठ्या प्रमाणावर विकसित झाले आहे.

(ब) **थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही दोन) :** [४]

१. अंदमान निकोबार बेटावरील उद्योगधंदे
२. गंगेचे मैदान (मध्यवर्ती) प्रदेशातील वाहतूक
३. पश्चिम हिमालय

३. (अ) **खाली दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा स्तंभालेख काढा :** [२]

| **वर्ष** | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|
| **लोकसंख्या (कोटींमध्ये)** | ५५ | ६८ | ८५ | १०३ | १२१ (तातुरती) |

(ब) खाली दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्यासंबंधी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : [२]




**प्रश्न :**

१. दख्खन पठार कोणकोणत्या राज्यात आहे?

२. भारताच्या किनाऱ्यालगत कोणते घाट आहेत?

३. आसाम राज्यातील मैदानी प्रदेशाचे नाव लिहा.

४. बंगालच्या उपसागरातील बेटांची नावे लिहा.

**(क) तुम्हास पुरविलेल्या भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील बाबी दाखवा व त्यांना नावे द्या (सूची आवश्यक आहे) (कोणतेही दोन) :** [२]

१. कर्कवृत्त     २. के - २

३. अमृतसर     ४. चिल्का सरोवर

**४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** [८]

१. पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशातील औद्योगिक विकासाचे वर्णन करा.

२. द्वीपकल्पीय (दख्खन) पठारावरील नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी यांची माहिती लिहा.

३. पश्चिम घाट व पश्चिम किनारपट्टीवरील पर्यटनस्थळांसाठी कोणते घटक कारणीभूत आहेत?

**५.** **रिकाम्या जागी योग्य तो पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा:** **[२]**

१. तृतीय क्षेत्र हे ________ क्षेत्र म्हणूनही ओळखले जाते.

(कृषि, औद्योगिक, सेवा)

२. कमाल नफा मिळवणे हा ________ अर्थव्यवस्थेतील उत्पादकांचा मुख्य होतू असतो.

(समाजवादी, भांडवलशाही, मिश्र)

**६.** **प्रत्येकी एक किंवा दोन वाक्यांत उत्तरे लिहा (कोणतेही तीन) :** **[६]**

१. 'उत्पादन कोणासाठी करावे?' ही समस्या स्पष्ट करा.

२. 'रोख निधी प्रमाण' म्हणजे काय?

३. 'तुटीचा अर्थभरणा' म्हणजे काय?

४. अन्नभेसळ म्हणजे काय?

५. सार्वजनिक वितरण प्रणालीची मुख्य उद्‌दिष्टे सांगा.

**७.** **पुढील प्रश्नांची पाच किंवा सहा वाक्यांत उत्तरे लिहा :** **[४]**

१. ग्राहकांचे अधिकार स्पष्ट करा.

२. वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यात घट होण्याची कारणे कोणती?